सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५.

दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८२ E-mail : gcoeara@gmail.com Web-Site : www.gcoeara.ac.in

जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२३/4429 दिनांक : 30 SEP 2023

## -: विद्यार्थ्यासाठी महत्वाची सुचना :-

**संदर्भ-** सा.फु.पुणे विद्यापिठ यांचे दि. २९/०९/२०२३ रोजीचे परिक्षा अर्ज भरण्याबाबत प्रदर्शीत झालेले वेळापत्रक

महाविद्यालयातील चालू शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम/व्दितीय/तृतीय/चतुर्थ (FE/SE/TE/BE) वर्षात प्रवेशित व Backlog / YD असलेल्या सर्व विद्यार्थ्याना. सुचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२३ या प्रथम सत्रातील परीक्षा अर्ज भरून घेणे सुरू झाले आहे. **अंतिम मुदत दिनांक ०९/१०/२०२३** ही देण्यात आलेली आहे. प्रथमत: प्रथम वर्षातील व थेट व्दितीय वर्षात (FE/DSE) प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी **Digilocker** या संकेतस्थळावर जावून **Register** करून **ABC (Academic Bank Credit) Number** मिळवावा व **Online** परीक्षा अर्ज भरतांना परीक्षा अर्जात सदर Number नमुद करावा.

तदनंतर प्रथम/व्दितीय/तृतीय/चतुर्थ (FE/SE/TE/BE) वर्षात प्रवेशित व Backlog / YD असलेल्या विद्यार्थ्यानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ यांचे संकेतस्थळावर (www.unipune.ac.in) जावून ऑनलाईन पध्दतीने परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी ,संबंधित विभागातील शिक्षकांकडून आपल्याला कोणते विषय आहेत. तसेच कोणते ऑडीट कोर्स /Special /Elective/Honours इत्यादी विषय लागू आहेत, याबाबत प्रथमत: चौकशी करावी. त्यांनतर ऑनलाईन परीक्षा अर्ज काळजीपुर्वक भरून परीक्षा अर्ज योग्य पदधतीने भरल्याची खात्री करावी. मगच परीक्षा अर्जाची प्रिंट आउट काढून परीक्षा अर्जावर नमुद असलेले परीक्षा शुल्क **SBI Collect** वर ऑनलांईन पध्दतीने भरून शुल्क भरलेली पावतीची प्रिंट तसेच मागील वर्षाच्या सर्व सत्र /वर्षाच्या गुणपत्रिका व Admission Confirmation परीक्षा अर्जासोबत जोडून, विद्यार्थ्यानी परीक्षा अर्जात नमुद केलेला (TH/OR/PR/Audit Course/Elective/Honours subject) बरोबर असल्याची संबंधित विभागातील नेमुन दिलेल्या शिक्षकाकडून खातरजमा करावी व त्यावर संबंधित शिक्षकाची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर कार्यालयातील विद्यार्थी विभागात स्वत: जावून परीक्षा अर्जाची पडताळणी केल्यानंतर रोखपालकडून पेमेंट रिसीप्ट चेक करून सदर अर्ज डि.पी.यू. विभागात जमा करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी विद्यापिठाकडून दिलेल्या मुदतीपुर्वी **(दि. ०९/१०/२०२३)** परीक्षा अर्ज भरून व त्याची प्रिंट आउट काढून विद्यार्थी विभागातून पडताळणी करून व रोखपाल यांच्याकडून चेक करून डि.पी.यू. विभागात जमा न केल्यामुळे भविष्यात होणा-या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार असेल, याची सर्व विद्यार्थ्यानी गांभिर्याने नोंद घ्यावी.

30-9-23

(डॉ. दि. रा. पानगव्हाणे)
प्राचार्य,
शासकिय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि.पुणे.

प्रत- माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१.विभागप्रमुख-अणुविद्युत/उपकरणीकरण/संगणक/स्वयंचल/स्थापत्य/यंत्र/उपयोजित वि./कर्मशाळा त्यांनी ही सुचना आपल्या विभागातील विद्यार्थ्याच्या What,s App ग्रुप वर त्वरीत पाठवावी.

२. डि. पी. यु. विभाग यांनी सदर सुचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी.व संस्थेच्या संकेतस्थळावर वरीत प्रदर्शित करावी.